# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com


संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शा.नि.क्र.जिवायो 1007/प्र.क्र.39/ का-1444, दि. 16 फेब्रुवारी, 2008
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाचा शा.नि.क्र.बीडीजी-2016/प्र.क्र.172/इमा-1, दि.19.09.2016
3. गृह विभागाचा शासन निर्णय क्रं.सीसीटी -3615/ प्र.क्र.36/पोल - 3, दि.01.01.2017
4. गृह विभागाचा शासन निर्णय क्रं.दुरुस्ती - 0117/ प्र.क्र.69/पोल - 7, दि.21.09.2017
5. प्र.पोलीस अधिक्षक, परभणी यांचे प्रशासकीय मान्यतेसाठीचे प्रस्ताव क्रं.पव्यशा - 4 /अनुदान/2018/7589, दि.10.12.2018

---

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/प्र.मा./का.क्र.1/ 51

दि.4 जानेवारी, 2018

## जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018-19 अंतर्गत प्रशासकीय मान्यता आदेश

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 अंतर्गत शासकीय कार्यालयीन इमारतीसाठी रु 200.00 लक्ष तरतूद मंजूर आहे त्यापैकी यापूर्वी रु.44.87 लक्ष रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

पोलीस अधिक्षक, परभणी यांनी संदर्भ क्रं.5 अन्वये खालील परिशिष्टात दर्शविलेल्या तांत्रिक मान्यतेसह प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास अधिन राहून व उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालील परिशिष्टात दर्शविलेल्या कामासाठी रु.14.95 लक्ष (अक्षरी रुपये चौदा लक्ष पंच्यान्नव हजार फक्त) च्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ क्र | योजनेचे नाव | लेखाशिर्ष व उद्दीष्ट संकेतांक | मंजूर तरतूद | प्रशासकिय मान्यता रक्कम |
|---|---|---|---|---|
| | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी** | | | |
| | **शासकिय कार्यालयीन इमारती अंतर्गत -** | (4515 0629) | 200.00 | |
| 1 | पोलीस स्टेशन, पिंपळदरी अंतर्गत राणीसावरगाव दुरक्षेत्र येथे महिला पोलीस कर्मचारी यांचेसाठी स्वच्छतागृह व विश्रांतीकक्षाचे बांधकाम करणे | 53 - मोठी बांधकामे | | 14.95 |
| | **एकूण** | | **200.00** | **14.95** |

**(अक्षरी रुपये चौदा लक्ष पंच्यान्नव हजार फक्त)**

### अटी व शर्ती

1. सदर कामाची/योजनेची अंमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना/निकषानुसारच करण्यात यावी तसेच शासन स्तरावर मंजुर केलेल्या कामाची व्दिरुक्ती होणार नाही व सदरीचे काम अनुज्ञेय असल्याची खात्री करुनच सदर काम अनुज्ञेय असल्यासच कामास सुरुवात करावी.

2. सदरील कामांवर प्रशासकिय मान्यता दिलेल्या रक्कमेच्या अधिन राहूनच खर्च करण्यात यावा. तसेच सदरील कामे अन्य कोणत्याही निधीमधून घेण्यात आली नाही याची खात्री करावी.

3. या आदेशान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी चालू आर्थिक वर्षाअखेरीस अखर्चित राहिल्यास वा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहिल.

4. प्रस्तूत कामांना तांत्रीक मान्यतेच्या अधिन राहून निधी वितरण करण्यात येत आहे. प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामाची पुनरावृत्ती झालेली नाही / तसेच हे काम यापुर्वी कोणत्याही योजनेत झालेले नाही याची खात्री करूनच प्रत्यक्ष कामाला सुरूवात करावी. कामाची पुनरावृत्ती झाल्यास किंवा हे काम पुर्वी झालेले असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील त्याबाबत या कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

5. या योजनेंतर्गत वितरित करण्यात आलेल्या निधीचे उपयोगीता प्रमाणपत्रे, कामाचे पुर्णत्वाचे दाखले, महालेखापाल यांचे कार्यालयातील अभिलेखाशी खर्चाचे ताळमेळ घालून ताळमेळाची एक प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

6. या योजनेंतर्गत होणाऱ्या खर्चाचे हिशेब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि दरमहा 5 तारखेपुर्वी या कार्यालयास प्रगती अहवाल सादर करावा.

7. या योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा कमिटी, विधीमंडळ, कामकाज इत्यादी बाबींसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्याचे मंत्रालयीन प्रशासकिय विभाग जबाबदार राहिल.

8. प्रस्तूत कामास लागणारी जमीन आपल्या विभागाच्या ताब्यात आहे याची खातरजमा करूनच काम सुरु करावे. प्रत्याक्ष कामाला सुरुवात केल्यानंतर जागेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

9. अंदाजपत्रकातील दराबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तरतूदीचे अनुपालन झाले असल्याबद्दलची खात्री करुन घेण्यात यावी.

10. सदरील बांधकामाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधीत विभागाची राहील. देखभाल दुरुस्तीसाठी या योजनेंतर्गत कोणतीही तरतूद उपलब्ध होणार नाही. अंदाजपत्रकात प्रत्येक दरांचे वर्णन / दर / दरपृथःकरण / रक्कम /दर पृथःकरणातील गृहित धरलेली अंतरे व अनुषंगिक ईतर बाबी तांत्रीक मान्यता प्रदान करण्यास सक्षम अधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर तपासणे अनिवार्य आहे. या संदर्भात या कार्यालयाचे/शासनाचे कोणतेही उतरदायित्व असणार नाही.

11. या आदेशान्वये वितरित करण्यात येत असलेला निधीचा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

**लेखाशिर्ष - नियोजन विभाग - मागणी क्रमांक (भांडवली) ओ-51**

4515, इतर ग्राम विकास कार्यक्रमावरिल भांडवली खर्च
(00) 800, इतर खर्च
(49) जिल्हा योजना- परभणी
(49)(01) इतर जिल्हा योजना (4515 0629)
53 - मोठी बांधकामे

प्रति,

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - पोलीस अधिक्षक, परभणी जिल्हा यांना माहितीस्तव

स्वा/-
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी